# दृष्टिज्योत

डोळ्यांना दिसत नसलं
म्हणून काय झालं !
अंधानाही स्वप्न
पाहता येतं
मन:चक्षूच्या सहाय्याने
ते, अधिक उजळ दिसत असतं.... ।।धृ।।
दोन डोळे
दोन हात
दोन पाय
एक हृदय
एक मेंदू
एक शरीर
मिळून बनतो माणूस
बुबुळाचे दरवाजे असले जरी बंद
अंतकरणातला प्रकाश
हृदयाचा गाभारा टाकतो उजळून
अन् देतो इंद्रियांना नवचैतन्यांची शक्ती खूप
नवचैतन्याच्या सहाय्याने
स्पर्श बोलू लागतात
त्वचेलाही मग नव्याने डोळे येतात
ब्रेललिपीची भाषा चक्क ते वाचू लागतात
असंख्य असंख्य डोळ्यांची ही दृष्टी
करत राहते स्वप्नांची बांधणी
म्हणूनच म्हणते
बुबुळांना दिसत नसलं
म्हणून काय झालं
अंधानाही स्वप्न पाहता येतं
मन:चक्षूच्या सहाय्याने ते
अधिक उजळ दिसत असतं ...।।१।।
अंध कसे ?
हे तर डोळसच म्हणा
कारण
कारण उघड्या डोळ्यांनाही
कधी कधी दिसत नाही
ते हे पाहू शकतात
सांगायचं झालं तर
गरिबांची भूक
अनाथांचे दु:ख
रोग्यांची वेदना
आईची अगतिकता
आर्ततेची हाक
काळजातली आस
यांना दिसत असते
म्हणूनच म्हणते
नसले डोळे तरी
ते 'हृदयाने' डोळस असतात
आपल्यापेक्षाही ते
अधिक दूरवरचे पाहत असतात ...।।२।।
हृदयाचे स्पंदन, मौल्यवान खरे
देतात ते मानवाला
माणुसकीचे खरेखुरे दोन नेत्रहिरे
नेत्रहिऱ्यांनी पाहिले
स्वप्न नजरेचे
स्वप्न एकतेचे
स्वप्न राष्ट्रउभारणीचे
स्वप्न देशबांधणीचे
स्वप्न महासत्तेचे
हे स्वप्न साकारण्यासाठी
मरणोत्तर नेत्रदान करा
मात्र
मात्र नेत्रदानाचा संकल्प आजच करा
डोळस स्वप्नांना या
गरुडाचे दोन पंख द्या
हृदयाच्या स्पंदनांना
नजरेचा नजराणा द्या
माणुसकीच्या तेलवातीत
दृष्टिज्योत उजळू द्या... ।।३।।

–डॉ.सौ.सुधा कांकरिया

साईसूर्य नेत्रसेवा
संशोधन आणि प्रशिक्षण